ISSN : 2347-4777

# INTERNATIONAL JOURNAL OF CULTURAL STUDIES AND SOCIAL SCIENCES

(UGC approved Multi-disciplinary Peer-Reviewed Journal)
UGC Journal Serial No.49228 in 2019 list
Currently Indexed in UGC CARE LIST, Serial No.159 in 2022 list

Vol-20, Issue-1, No.21, January - June: 2024



Eds.
Amitava Roy, Ronan Paterson,
Bryan Reynolds, Subir Dhar, Papia Mitra

A Special Publication of
Tagore Gandhi Institute
The Shakespeare Society of Eastern India.

ap

# INTERNATIONAL JOURNALOF CULTURAL STUDIES AND SOCIAL SCIENCES

(UGC CARE approved Multi-disciplinary Peer-Reviewed Journal)

**Vol. - XX, Issue-1, No.21, January-June: 2024**

ISSN : 2347-4777

Eds.

Amitava Roy,

Ronan Paterson,

Bryan Reynolds,

Subir Dhar,

Papia Mitra

AVANTGARDE PRESS

TAGORE–GANDHI INSTITUTE / SHAKESPEARE SOCIETYAVANTGARDE PRESS

# UGC APPROVED JOURNAL 2017

Serial No. 49228

## UGC Journal Details

| | |
|---|---|
| Name of the Journal | International Journal of Cultural Studies and Social Sciences |
| ISSN Number | 23474777 |
| Source | UNV |
| Subject | Cultural Studies, English Literature |
| Publisher | AVANTGARDE PRESS |
| Country of Publication | India |
| Broad Subject Category | Arts & Humanities;Multidisciplinary |

## UGC-CARE LIST SINCE 2019

| Sr.No. | Journal Title | Publisher | ISSN | E-ISSN | UGC-CARE coverage year | Details |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Acta Fytotechnica et Zootechnica | Slovak University of Agriculture in Nitra | 1335-258X | 1336-9245 | from June - 2019 to July - 2020 | Indexed in Scopus |
| 2 | Acta Graphica | Faculty of Graphic Arts, University of Zagreb | 0353-4707 | 1848-3828 | from June - 2019 to October - 2020 | Discontinued from Oct. 2020 |

## UGC-CARE LIST SINCE 2022

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 165 | International Journal of Cultural Studies and Social Sciences | Avantgarde Press, Tagore-Gandhi Institute/Shakespeare Society | 2347-4777 | NA | from January - 2020 to Present | View |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 430 | Theatre International | Avantgarde Press, Tagore-Gandhi Institute/Shakespeare Society | 2278 - 2036 | NA | from January - 2020 to Present | View |

| | | |
|---|---|---|
| 20 | ELECTRONIC COMMERCE AND MANAGEMENT: A STUDY ON CHALLENEGES IN AN EMERGING ECONOMY | 89 |
| 21 | UNDERSTANDING THE BUYING BEHAVIOR OF CONSUMERS IN THE FAST-MOVING CONSUMER GOODS MARKET IN INDIA: TRENDS, INFLUENCES, AND IMPLICATIONS | 95 |
| 22 | AN ANALYSIS OF RISK TOLERANCE OF INDIVIDUAL INVESTOR USING GRAY RELATIONAL ANALYSIS METHOD | 98 |
| 23 | EMPLOYABILITY OF BUSINESS EDUCATION IN INDIA | 110 |
| 24 | भारतातील दारिद्र्य आणि आर्थिक विषमता | 114 |
| 25 | आदिवासी महिलांच्या विकासात महिला स्वयंसहायता समूहाची भूमिका | 118 |
| 26 | बँकिंग उद्योगातील कार्य-जीवन संतुलनावर तांत्रिक प्रगती आणि त्यांचा प्रभाव | 128 |
| 27 | मराठी बखरीचे पुन: वाचन | 129 |
| 28 | साहित्य आणि समाज | 133 |
| 29 | EXAMINING INTEGRATED PROMOTION STRATEGIES IN AMRAVATI'S FURNITURE SECTOR | 139 |
| 30 | ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम एक अभ्यास | 142 |
| 31 | महाराष्ट्र राज्य औदोगिक विकास महामंडळातील उद्योग आणि उद्योजक | 149 |
| 32 | BARTERING SYSTEM TO CRYPTO CURRENCY: A JOURNEY IMPACTED BY DIGITAL INDIA MISSION | 150 |
| 33 | "पश्चिम विदर्भातील कृषी आधारीत लघुउद्योगांच्या व्यवस्थापनावर जागतिकीकरणाच्या परिणामांचे विश्लेषणात्मक अध्ययन" | 156 |
| 34 | A STUDY ON DIGITAL ECONOMY IN INDIA | 162 |
| 35 | ETHICAL DILEMMAS & CONSIDERATIONS: CODE OF CONDUCT FOR SCHOOL COUNSELORS | 167 |
| 36 | "स्त्रियांच्या प्रगतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान" Dr. A. R. Kahane | 174 |
| 37 | मुद्रास्फीती नियंत्रणामध्ये रिजर्व बैंक ऑफ इंडियाची भूमीका | 179 |
| 38 | FLOAT BOT TREND AND OPPORTUNITIES- A CASE STUDY OF JPC TECHNOLOGIES, BHAVNAGAR | 182 |
| 39 | ROLE OF NORKA IN THE REHABILITATION OF FOREIGN RETURNEES OF KERALA | 189 |

# "स्त्रियांच्या प्रगतीत डॉ. बापासाहेब आंबेडकर यांचे योगदान"

**प्रा. डॉ. अंशुमती राजेंद्र काहाणे** मराठी विभाग प्रमुख, श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी ता. अंजनगाव सुर्ती, जि. अमरावती ई-मेलः anahumati.pendekham@gmail.com

भारतात महिलांचे उद्धारक अनेक झाले. परंतु कैवारी मात्र एकच झाले, बोधिसत्व प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मोतोश्री रमाईना पारविलोया एक पत्रात त्यांनी स्त्रियांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी एक योध्दा आहे. असे म्हटले आहे. ते सर्वार्थाने खरे आहे. दोन्ही हाती शस्त्र घेवून, स्त्रियांच्या हक्कासाठी लढणारा असा वीर योध्दा पुन्हा होणे नाही. एका हाती कायद्याचे शस्त्र, तर दुसऱ्या हाती चळवळीचे, सर्व भारतीय स्त्रियांनी या एका कारणासाठी त्यांना प्रातःस्मरणीय मानले पाहिजे. आपल्या उण्यापुऱ्या ६५ वर्षाच्या आयुष्यात या विग्रही योध्याने सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक अशी चारही क्षेत्रे पादाक्रांत केली. परंतु या पराक्रमाला जोड होती, करुणेची. स्त्रिया आणि शुद्रादी प्रजेवर जातिव्यवस्थेने केलेल्या पराकोटीच्या अन्याय-अत्याचाराची चीड व त्या शोषणाला बळी पडलेल्या विषयी करुणा यातून बाबासाहेबांनी या देशात सामाजिक क्रांती केली बुद्धानंतरची ही दुसरी क्रांती. हिंदू समाजातील सगळ्या प्रकारच्या विषमातांपैकी एक, म्हणजे स्त्री-पुरुष विषमता तिच्यामुळे स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वापरलेले महत्वाचे अस्त्र म्हणजे कायदा. स्वतःचे सारे पांडित्य त्यांनी हिंदू कोड बिलासाठी पणाला लावले. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या कायद्यांची संहिता आधी बदलली पाहिजे व स्त्री-केंद्री बनविली पाहिजे, हा त्यामागील हेतू होता.

**महिलांसाठी सुरक्षाकवच - हिंदू कोड बिल:**

हिंदू कोड बिलाच्या संबंधात आपली भूमिका स्पष्ट करतांना कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. "समाजातील वर्गावर्गातील असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातील असमानता तशीच अस्पर्शित राहू देऊन, आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे होय, आणि शेणाच्या ढिगाऱ्यावर राजप्रसाद बांधण्यासारखे होय, हिंदू संहितेला मी हे महत्व देतो."

बाबासाहेवांनी हे उद्‌गार हिंदू कोड बिलाच्या मसुद्यावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी काढलेले आहेत. हिंदू कायद्याच्या संहितीकरणाविषयीच्या विधेयकाला बाबासाहेबांच्या लेखी अनन्यसाधारण महत्व होते. कारण पूर्वी म्हटल्याप्रमाणे त्यायोगे स्त्रियांच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या भेदभावाला आळा बसून, त्या अधिक समक्ष बनतील, हा त्यांना विश्वास होता. सम्यक क्रांतीच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग सक्रिय असल्याशिवाय ती यशस्वी होऊ शकणार नाही. हे जाणून त्यांच्या प्रगतीची बाट मोकळी करण्यासाठी त्यांनी या काळात प्राधान्य दिले, ते स्त्रियांशी संबंधित कायद्यांमध्ये सुधारणा करण्याला हे एक एक प्रकारे सुरक्षा कवच होते स्त्रियांसाठी.

या विधेयकाचा प्रस्ताव मांडत असतांना कायदेमंत्री डॉ. बाबासाहेय आंबेडकर यांनी जे भाषण केले, ते अंत्यत नेटके, मुद्देसूद व जुन्या कायद्यांमध्ये केलेल्या प्रस्तावित बदानांचा नेमका निर्देश करणारे होते. एक महत्याचे विधेयक सत्राच्या अगदी शेवटी चर्चेसाठी सदनासमोर यांचे याविषयी दुःख व्यक्त करुन बाबासाहेब बोलू लागतात. "महोदय, हे विधेयक सात भिन्न बाबीशी संबंधित कायद्याचे संहितीकरण करन पाहते. सर्वप्रथम हे विधेयक अशा मृत हिंदूच्या व्यक्तीच्या म्हणजे स्त्री व पुरुष दोघांच्याही,

मालमत्तेच्या हक्कांशी संबंधीत नियमांचे संहितीकरण करु इच्छिते, जी व्यक्ती इच्छापत्र न करता मेलेली असते. दुसरे म्हणजे भिन्न- भिन्न वारसामध्ये वारसांच्या कर्माचा स्वरुपात काही विहित करते. या विधेकाद्वारा हाताळलेले गेलेले पुढचे विषय पोटगी, विवाह, घटस्फोट, दत्तकविधान, अज्ञान पालकत्व यांचे कायदे हे आहेत."

हिंदू कोड बिल हे बाबासाहोंच्या जीवनाचेच ध्येय झाले होते. १९४७ पासून सतत ४ वर्ष १ महिना २६ दिवस यांनी अथक परिश्रम घेतले, त्यांचे अंतिम उद्दीष्ट स्त्रियांना कायद्याने हक्क आणि दर्जा आणि प्रतीष्ठा प्राप्त व्हावी, हेच होते. परंतु एवढया कष्टांनी स्वी-स्वातंत्र्याचा जाहीरनामा असलेले हे हिंदू संहिता विधेयक, विधानसभेत मंजूर होऊ शकले नाही. त्यातली घटस्फोट, द्विभाषांप्रतिबंध यासारखी कलमे विरोधकांकडून विवाद्य बनविण्यात आली. बिलाच्या विरोधांना बाबासाहेबांनी २० सप्टेंबर १९५९ रोजी अत्यंत जोरदार, मार्मिक उत्तर दिले. "आज सुधारणेच्या युगात स्त्रियांना समान हक्क द्यायला तुम्ही विरोध का करता? स्त्रियांना इस्टेटीत वाटा देण्यास मनूनेही नकार दिला नाही, मग तुम्ही का देता?" असा सवाल त्यांनी सनातन्यांना केला. एकटे बाबासाहेब लढत राहिले. पण सत्र संपले. तेव्हा हिंदू कोड बिलाची फक्त ४ कलमे मंजूर झाली. त्यामुळे अत्यंत दुःखी व निराश होऊन डॉ. बाबासाहेबांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा २७ सप्टेंबर १९५१ रोजी राजीनामा दिला. येवढा प्रचंड त्याग बाबासाहेबांनी स्त्रियांच्या हक्कासाठी केला! पुढे १९५२ नंतर केंद्र सरकारने बाधासाहेबांच्याच मसुद्यातून ४ स्वतंत्र कायदे बनविले, ते म्हणजे -

१) दि हिंदू मॅरेज ॲक्ट १९५५

२) दि हिंदू सक्शेसन ॲक्ट १९५६ (जुन)

३) दि हिंदू मायनॉरिटी ॲड गार्डीयनशिप ॲक्ट १९५६ (ऑगस्ट)

४) दि हिंदू ॲडोप्शन ॲन्ड मेन्टेनन्स ॲक्ट, १९५६ (डिसेंबर)

**डॉ. आंबेडकर प्रणीत वैचारिक अधिष्ठान:**

मनुस्मृतीच्या २, ५, ८ व ९ था अध्यायांमधून भरपूर श्लोक उध्दत करुन मनूच्या स्त्री विरोधी कायद्यांचा स्त्री - निदेंचा खरपूस समाचार बाबासाहेबानी घेतला. हिंदुस्थानातील स्त्रियांच्या अवनतीला बुध्दाची शिकवण कारणीभूत झाली. अशा आशयाच्या 'ईव्हजूवीकली' मासिकात जानेवारी १९५० मध्ये प्रकाशित लेखाला बाबासाहेबांनी या लेखाद्वारे तर्कशुध्द उत्तर दिले. हिंदू स्त्रियांच्या दुर्दशेला बुध्द जबाबदार नसुन मनूच जबाबदार आहे, हे सिध्द करुन भ. बुध्दांवरील सर्व आरोपांचे खंडन सप्रमाण केले. अडीच हजार वर्षापूर्वी भिख्युणी संघ स्थापन करुन भ. बुध्दांनी स्त्रियांसाठी ज्ञानार्जन व आध्यात्मिक उन्नती यांचा मार्ग त्या बाळातही, कसा मोकळा करुन दिला हे प्रतिपादन करीत असतांना, डॉ. बाबासाहेबांनी बौध्द संस्कृतीसाठी किती मूलगामी अभ्यास केला होता, याचे प्रत्यंतर येते. १९०९ मध्ये 'साम्स ऑफ द सिस्टर्स' हा थेरीगाथांवरील ग्रंथ लिहिणाऱ्या श्रीमती ऱ्हिस डेव्हिड्स किंवा १९३० मध्ये 'विमेन अंडर प्रिमिटिव्ह बुध्दिझम' हा ग्रंथ लिहिणाऱ्या ब्रिटिश अभ्यासक श्रीमती आय बी होर्नर यांचे नावही कधी स्त्रि-वादी विचारवंत गेल्या ३० वर्षात घेताना दिसल्या नाहीत.

**चळवळीतील प्रत्यक्ष स्त्री-सहभागाचे जनक:**

१९२७ च्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात स्त्रियांच्या सहभागाला सुरुवातच मुळी फार मोठ्या प्रमाणावर झाली. १९३० च्या काळाराम मंदिर सत्याग्रहात पहिली अटक होणारी तुकडी स्त्रियांचीच होती. १९४२ च्या नागपूरात आयोजित अखिल भारतीय दलित परिषदेत हा सहभाग इतका वाढला की महिलांचे

स्वतंत्र अधिवेशन घेण्यात आले. त्या काळात राधाबाई कांबळे, जाईबाई चौधरी, अंजनीबाई देशभ्रतार, गीताबाई गायकवाड, सुलोचनाबाई डोंगरे, शांताबाई दाणी, मीराताई आंबेडकर, कीर्तीबाई व इंदिराबाई पाटील अशा महिला नेत्या आंबेडकरी चळवळ लोकांपर्यंत नेत होत्या. चले जावच्या तोडीचा हा स्त्री सहभाग होता सर्वजनिक क्षेत्र आजदेखील पुरुषप्रधान आहे. मग तेव्हा ते किती असेल अशा परिस्थितीत गावातील सर्वसामान्य बाईला, दलित शोषित वर्गातील स्त्रिला घराचा उंबरठा ओलांडावयास लावून प्रत्यक्ष लढ्यात सक्रिय करणे हो गोष्ट अभूतपूर्व होती.

**बाबासाहेबांचा महिलांना उपदेश:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड संग्राम परिषदेत महिलांना उद्देशून जो उपदेश केला त्याचे स्मरण होणे स्वाभाविक आहे. एवढा सोपा, साधापरंतू सारगर्भ उपदेश, तोही एका महापंडितांच्या तोंडून? विद्वान सोपे बोलू शकत नाही, हा समज बाबासाहेबांनी खोटा वरविला. येथे मला भगवान बुध्दाच्या संदर्भात वापरण्यात आलेला एक शब्द आठवतो. तो म्हणजे 'उपायकौशल्य' बाबासाहेब साध्याभोळ्या गरीब कष्टकरी भगिनींसाठी मात्र छोटी छोटी सोपी वाक्ये योजतात, तेव्हा बुध्दांच्या उपाय कौशल्याची आठवण येते.

तुम्ही स्वतःस अस्पृश्य मानू नका, घरी स्वच्छता ठेवा, स्पृश्य हिंदू नेसतात. त्या पध्दतीने नेसा, फाटके का लुगडे असेना, ते स्वच्छ पाहिजे, भाराभर गळसऱ्या व हातात कोपरभर चांदीचे गोट-पाटल्या हो तुम्हास ओळखण्याची खूण आहे, दागिना घालायचा तर सोन्याचा घाला. कोणतीही अमंगल गोष्ट होऊ देऊ नका, मेलेल्या जनावराचे मांस खाणे बंद करा, दारुबाज नवऱ्यांना, भावांना अगर मुलांना जेवायला घालू नका. मुलींना शिक्षण द्या. ज्ञान व विद्या या गोष्टी स्त्रियांनाही आवश्यक आहेत.

स्वाभिमान जागवण्यासाठी व प्रबोधनाची भूमिका बाबासाहेबांनी एकाच वेळी घेतलेली होती. स्त्रि व पुरुष यांनी मिळून समाजाच्या संसाराच्या अडचणी सोडवल्या पाहिजेत. पुरुषांनीच हे काम अंगावर घेतले तर ते पार पाडण्यास त्यांना फार अवधी लागेल. तेच काम स्त्रिनी जर अंगावर घेतले, तर त्यांना त्या कामात लवकर यश प्राप्त होईल, असे त्यांचे मत होते. याच सभेत बाबासाहेबांनी दलित स्त्रियांच्या राहणीबद्दल प्रबोधन केले. मुलामुलींना शिक्षण देण्यास सांगितले. विशेषतः मुलीच्या शिक्षणावर भर दिला. या प्रबोधनाचा तात्काळ परिणाम दिसून आला. सभेवरुन परततांना स्त्रियांच्या वस्त्र नेसण्याच्या पध्दतीत बदल झालेला होता. ब्रिटिशांच्या राजवटीत दलित पुरुषांबरोबरच स्त्रियांना देखील क्रांतिप्रवण होण्याच प्रशिक्षण बाबासाहेबांनी दिले. कारण त्यांची प्रामाणिक धारणा होती की स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे. दि. २० जुलै १९४२ साली नागपूरला दलित स्त्रियांची परिषद (सभा) आयोजित करण्यात आली होती. त्या सभेत २०-२५ हजार स्त्रिया उपस्थित पाहून बाबासाहेबांना आनंद झाला. ते म्हणाले, स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. याच भाषणात त्यांनी लग्नाच्या मुलीसाठी दिलेला उपदेश दिसतो. लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्यांच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे, मात्र गुलामासारखे वागवल्यास तिने खंबीरपणे नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा.

लिंगभेदामुळे स्त्रियांवर घोर अत्याचार झालेले होते आणि आजही वास्तवात होत आहेत. कारण परंपरेचा कायदा आजही प्रभावी आहे. पण आज स्त्रि-मुक्ती संघटना ह्या अत्याचाराविरुध्द लढत आहेत. विशेषतः स्त्रियांनी ही बाजू कणखरपणे सांभाळल्यामुळे काही प्रमाणात का होईना चित्र बरेच पालटलेले दिसते. स्त्रि मुक्ती बरोबरच स्त्रि-वादाचा आग्रह स्त्री-संघटनांनी धरलेला दिसतो. त्यामुळे स्त्रि हक्काची भूमिका

अर्थातच आग्रही ठरते. शिक्षणाचा अधिकारच जेथे नाकारलेला होता, तेथे शिक्षणाची (स्त्रियांच्या) काय प्रगती झाली. तिचा (दहा-दहा वर्षाचा आलेख स्पष्ट करतो की, स्त्रियांची शिक्षणातील प्रगती दिवसेंदिवस वाढली दिसत आहे. विशेषतः परंपरावादी दृष्टिकोन ज्यांना केवळ चूल, घर व मुले सांभाळणे यापर्यंतच मर्यादित ठेवत होते किंवा आहेत त्यांच्यापुढे एकूण शैक्षणिक क्षेत्रात स्त्रिया गुणवत्तेच्या बाबतीत पुरुषांना मागे टाकत असल्याचे चित्र आज दिसत आहे. परंपरागत कायद्यानी जखडलेली स्त्री डॉ. बाबासाहेबांच्या संविधानदत्त समतेच्या आधारावर विकासाची समान संधी मिळाल्याबरोबर शिक्षणातच नव्हे तर अर्थार्जन, सेवायोजनातील संधीमुळे तसेच नोकरीमुळे मिळालेल्या स्वावलंबनामुळे सक्षम होऊन सशक्तीकरणाची वाट चालू लागल्याचे दिसून येते. आज भारतात सर्वच क्षेत्रात आय.ए.एस., वकिल, न्यायाधिश, इंजीनिअर्स, डॉक्टर्स, बिझिनेस मॅनेजमेंट मधील अधिकारी, इंजिन ड्रायव्हर्स, पायलटस् पासून ते ऑटो रिक्षा ड्रायव्हर्स, रेल्वे हमाल आणि पुरुषी कर्तृत्वाच्या जागांवर आपले कर्तृत्व स्त्रियांनी सिध्द केलेले आहे. फार तर, शिक्षिका, नर्सेस किया प्राध्यापिकांपर्यंत स्त्रिया मजल मारतील असे समजणाऱ्यांना, यामुळे स्त्रियांनी चांगला धडा शिकवलेला आहे. एवढेच नव्हे तर, स्त्रियांची पुनर्निर्मितीची क्षमता व प्रकृती लक्षात घेऊन ४२ व्या कलमात स्त्रियांसाठी प्रसूती साहाय्याची तरतूद केली आहे. हे सर्व फायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानामुळे स्त्रियांना मिळाले.

हिन्दू कोडबिलाचा या दृष्टीने विचार करण्यासारखा आहे. स्त्रियांची कुटुंबातील स्थिती व समाजात मिळणारी प्रतिष्ठा याची जाणीव बाबासाहेबांना अस्वस्थ करून सोडत असे. पिढ्यानपिढ्या स्त्रिया कोणावर तरी अवलंबून, कधी पित्यावर, कधी पतीवर, तर कधी पुत्रावर अविरतपणे खपत होत्या. पण कोणीही स्वतंत्रपणे तिला आर्थिक बळ कधीच पुरवले नाही. अर्थार्जनाला देखील तिला मनाई. पतीच्या मृत्यूनंतर किंवा दीर्घ आजारानंतर तिला कोणाची तरी मदत मागावी लागे. कधी पितृकुळी तर कधी श्वशुरगृही आणि तेही उपकारादाखल तिला मदत करत. माहेरी भावजयांचे टोमणे तर सासरी ननंदा जावांचे छळणे सहन करत जगत राहणे, मुकाटपणे सोसणे एवढेच स्त्रियांना ठाऊक होते. ही परिस्थिती बदलून हिन्दू कुटुंबाची सुधारणा करुन स्त्रियांना अपमानजनक परिस्थितीतून बाहेर काढून सन्मानाचे स्थान व प्रतिष्ठा मिळवून द्यावी यासाठी हिंदू संहिता विधेयक म्हणजे हिंदू कोड बिलाचे काम, प्रकृती वाईट असून देखील त्यांनी जिद्दीने हाती घेतले. कारण या विधेयकामुळे स्त्रियांची उत्थानदशा स्पष्ट होईल असे त्यांना वाटत होते. वारसाचा हक्क मिळणे अतिशय महत्वाची बाब होती. कारण स्त्रियांना हा अधिकार मिळाल्याबरोबर त्यांची कुटुंबात किमत वाढली. तिच्या संमतीशिवाय काहीही होणे, पित्याची किया पतीची मालमत्ता मिळणे, तिची विल्हेवाट लावणे आदी गोष्टी शक्य नव्हत्या. याचा परिणाम लहानशा खेडोपाडी देखोल दिसू लागला. स्त्रिया आपल्या हक्कासाठी सजग होऊन उठून उभ्या राहिल्या, काहींनी हक्क बजावला.

डॉ. बाबासाहेबांना खूप मनस्ताप सहन करावा लागला, तो होता विवाहाचा, द्विभार्या प्रतिबंध, केव्हाही बायको कितीही वयाची (लहान पोर) पुरुषांच्या लहरीने घरात आणली जायची आणि गरोदर रीतसर केलेल्या विवाहाची बायको ही पायपुसण्यासारखी घरातून फेकली जाई. हा पोरखेळ थांबवून स्त्रियांची ही मानहानी नष्ट करण्याचे महत्वाचे कार्य बाबासाहेबांनी केले. डॉ. बाबासाहेबांना हिंदू कोडविलाबद्दल किती आस्था होती हे त्यांच्याच शब्दांतून आपल्याला कळते. ते म्हणतात, "मला वाटते हिन्दू संहितेसाठी आपण आपल्या विधिमंत्री पदावर राहावे कारण हिन्दू सामाजिक सुधारणेचे ते मोठे पाऊल होय, जे भारतीय कायदेमंडळाने पहिल्यांदा उचलले." *'न भूतो न भविष्यति'* अशा प्रकारचे हे बिल

म्हणून अतिशय महत्वाचे आहे. वर्गातील असमानता व स्त्री-पुरुयातील असमानता, जो हिन्दू समाजाचा प्राण आहे, तिला स्पर्श न करता सोडून देणे व आर्थिक समस्यांसाठी कायदे पारित करणे महणजे आमच्या राज्यघटनेचे हास्यास्पद विडंबन होय.

स्त्रिरांच्या हिताच्या दृष्टीने बाबासाहेबांनी हे अलौलिक कार्य केले. या कार्यासाठी भारतातील स्त्रि-वर्ग त्यांचा आजन्म ऋणी राहील. हे ऋण शब्दांद्वारे बोलक करतांना बॅ. सुनीती पुगलिया म्हणतात, "डॉ. आंबेडकरांनी हिन्दू कोडबिलाचा आग्रहच घरला, दलित समाजाचा नेता हिन्दू स्त्रियांच्या हक्कासाठीही निर्धाराने उभा राहिला." भारतीय स्त्री-स्वातंत्र्याचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा राजा राममोहन राय, गोपाळ गणेश आगरकर यांच्या बरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव सुवर्णक्षरांत लिहिले जाईल. आज भारतात स्त्री मुक्तीची चळवळ जोमाने मूळ धरु लागलेली दिसत असतांना, स्त्रिया स्वतः च्या मुक्तीचा मार्ग चोखाळत असतांना, बाबासाहेबांनी केलेल्या कायद्याची शिदोरी घेऊनच पुढची वाटचाल करतात. स्त्री-मुक्तीतीतून स्त्रि वादाकडे नेण्यात हे कायदे तितकीच महत्वाची भूमिका निभावतात आणि म्हणूनच स्त्रियांच्या उत्थानात डॉ. बाबासाहेबांचे कर्तृत्व लोकोत्तर आहे, यात वादच नाही.

**संदर्भ ग्रंथ:**


१) स्त्रि उत्थानात डॉ. बाबासाहेबांचे योगदान, प्रा. कुमुद पावडे

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे खंड १८, भाग-१, पृष्ठ १४३

३) डी. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे खंड १८, भाग-२, पृष्ठ ४२६

४) लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक ऑक्टोबर २००६

५) महिलांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉ. रुपा कुळकणी बोधी

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे, भाग-१ हिन्दू १७ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर १९५०

७) सकाळ दीक्षा-२०१२ डॉ. आंबेडकर स्त्री शक्तीचे उद्वाता प्रा. सुहास खंडारे